॥ ॐ ॥

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त

एप्रिल
२०२२


२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४     भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org


## १४ एप्रिल -
## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती
## विनम्र अभिवादन

### भारताचे संविधान
#### उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
आमच्या संविधानसभेत
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वतःप्रत अर्पण करीत आहोत.



# वर्षारंभ उपासना




तब्बल २ वर्षांनंतर प्रत्यक्ष उपस्थितीत शनिवार दि. २ एप्रिलला चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा ओंकारेश्वर मंदिरात मोठ्या उत्साहाने साजरा झाला. ओंकारेश्वराचा गाभारा आणि उपस्थितांची मने गायत्री मंत्र उपासनेच्या मंगल आणि पवित्र स्वरांनी भारावून गेली. 'ध्येय आपुले विकसित जीवन, राष्ट्रासाठी व्हावे अर्पण', या निश्चयाने नूतन वर्षाचा प्रारंभ आपल्या संस्थेचे कार्याध्यक्ष मा.श्री.रामभाऊ डिंबळे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने झाला. ७५ व्या वर्षात पदार्पण केलेल्या मा. रामभाऊंच्या जीवनपटाचा प्रेरणादायी प्रवास श्री. संजय तांबट यांनी त्यांच्या घेतलेल्या प्रकट मुलाखतीतून उलगडला. अभ्यासू, धाडसी, उत्साही, सतत कार्यमग्न असणाऱ्या रामभाऊंच्या आयुष्यातले अनुभव ऐकताना कार्यकर्ते भारावून गेले. यामध्ये अगदी खेड्यातून आलेला, बोलीभाषेत बोलणारा कार्यकर्ता स्वतःच्या कष्टाने, अभ्यासाने संस्कृत सारख्या भाषेत प्रभुत्व मिळवतो. लहान वयापासून कै.अप्पा पेंडसे यांच्या तालमीत घडलेल्या रामभाऊंनी प्रबोध उद्योगचा पसारा वाढवला आणि अनेक सामाजिक कामात ते आजही सक्रीय आहेत. प्रेरणा, चेतना, उत्साह वाढवणाऱ्या गुढीपाडव्याचे औचित्य साधून वर्धिनी परिवारातील सदस्यांनी एकमेकांना भेटून



उत्साहपूर्ण वातावरणात नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. मुलाखतीमधून मिळालेल्या प्रेरणेतून स्वतःच्या विकासासोबतच समर्पणासाठीचा सामूहिक संकल्प सर्वांनी केला.





# शाखा विभाग




**◆ शैक्षणिक संक्रमण उत्सव २०२१-२२**

कोरोनाच्या काळातील शाळा बंद असल्यामुळे पडलेला शैक्षणिक खंड बरेच नुकसान करून गेला. या काळात अभ्यासाचा आलेला कंटाळा झटकून काढणं महत्त्वाचं होतं. त्याचसोबत आनंदाने व रंजक पद्धतीने शिक्षण देणं गरजेचं होतं. त्यासाठीच संक्रमण उत्सव शैक्षणिक पद्धतीने घेण्यात आला. भाषा विकास, गणित, परिसर अभ्यास, प्रश्नपेढी आणि शैक्षणिक साहित्य निर्मिती या विषयांच्या माध्यमातून १ महिना सर्व शाखांमध्ये अभ्यास झाला.







भाषा – मराठी आणि इंग्रजी विषयातील म्हणी, वाक्प्रचार, शाब्दिक कोडी, उतारा वाचन यातून अभ्यास झाला.





गणित – मूलभूत गणिती क्रिया, पाढे, वर्ग, वर्गमूळ इत्यादींचे वैयक्तिक व सामूहिक पाठांतर व इयत्ताशः गणितातील संकल्पना स्पष्ट करण्यात आल्या.

प्रश्नपेढी – भाषा व सामाजिक शास्त्र विषयातील धड्यांवर प्रश्न काढले.

शैक्षणिक साहित्य निर्मिती – अभ्यासातील संकल्पना समजावून सांगण्यासाठी त्यावर आधारित साहित्य तयार केले.

वरील सर्व विषयांच्या सादरीकरणासाठी तक्ते, प्रकल्प व मौखिक पद्धतींचा वापर करण्यात आला.



◆ **क्रांतिज्योती सावित्री शाखेत** दि. ५ मार्चला १०० जणांच्या उपस्थितीत महिला दिन आणि शैक्षणिक संक्रांत उत्सव साजरा झाला. या प्रसंगी प्रमुख वक्त्या म्हणून सौ मंगलताई कुडलिंगार-देशपांडे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. पालकांचे विविध खेळ घेऊन त्यांचा सहभाग वाढवला. काही मुलींनी विज्ञान प्रयोग केले तर काहींनी गणित, इंग्रजी, भूगोल या विषयासंबंधी गमतीदार खेळ तयार केले.



लहान मुलींनी लिंबू सरबत, ओली भेळ, सँडविच, इडली यांचे स्टॉल लावले होते.



◆ **पालकांचे अनुभव...**

१. श्रद्धा कांबळे : आजच्या कार्यक्रमामुळे दैनंदिन जीवनातून महिलांना स्वतःसाठी थोडासा वेळ देता आला.

२. रेवती काकडे : खूप दिवसांनी खेळ खेळायला मिळाले त्यामुळे शाळेची आठवण आली.

३. राजश्री गायकवाड : परत एकदा बालपण जगलो असे वाटले.



◆ **धर्मवीर शंभूराजे शाखा** आणि धनकवडी भागात चालणाऱ्या **मुलींच्या**



**'प्रयत्न शाखे'ने** शिक्षण जत्रेचा अतिशय दिमाखदार कार्यक्रम पार पाडला. या उत्सवात वर्धक-वर्धिकांनी विज्ञानातील अनेक प्रयोग, माईंड गेम्स, विविध कला प्रकार अशा बऱ्याच गोष्टी स्वतः तयार केल्या आणि त्यांचे सादरीकरण केले. शिक्षण







क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी, इतर शाखेतील कार्यकर्ते, पालक अशा सर्वांनी प्रदर्शनाला भेट देऊन सर्वांना शाबासकीची थाप दिली.

◆ **स्वामी दयानंद सरस्वती शाखा** आयोजित शिवजयंती कार्यक्रम दि. २१ मार्चला साजरा झाला. शिवजयंती निमित्ताने परिसरातील नागरिकांसाठी श्री. निलेशजी धायरकर यांचे 'या झेंड्याचे हे आवाहन' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.



सर्वप्रथम १५० वर्धकांची प्रियदर्शनी शाळेपासून ते बाळासाहेब ठाकरे सभागृह, सुप्पर इंदिरानगरपर्यंत घोषणा देत व पद्य म्हणत पदयात्रा काढण्यात आली. त्यांतर झालेल्या व्याख्यानात त्यांनी महाराजांची



स्वराज्याची कल्पना, महाराजांनी कमावलेले जीवापाड प्रेम करणारे मावळे, महाराजांचे संघटन कौशल्य, युध्द नीती कौशल्य अशा अनेक पैलूंवर गोष्टीरूपात प्रकाश टाकला. एकूण उपस्थिती ३५२ होती.

◆ **शंभूराजे शाखेत** दि. ११ एप्रिलला वर्धिनीचा युवा कार्यकर्ता आणि UPSC मध्ये निवड झालेल्या श्री. पार्थ कश्यप याच्या मुलाखतीचा कार्यक्रम संपन्न झाला. पार्थ दादाने शाखेचा वर्धक ते अधिकारी असा प्रवास उलगडला. वर्धक, युवक असतानाचे शाखेतील अनुभव, आठवणी, त्याने अभ्यासासाठी घेतलेली मेहनत, शाखेतील कामाचा त्याच्या यशामध्ये झालेला उपयोग असे अनेक विषय त्याने गप्पांमधून मांडले. मुलांना पडलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. शाखा पालक श्री रामकृष्ण चिंचकर सरांनी समारोप केला.

◆ **समर्थ रामकृष्ण शाखेत** वर्धिनीच्या मनुष्य घडणीचा महत्त्वाचा आयाम असणारी मानसिक विकास बैठक नियमित आणि प्रभावी होत आहे. मा. रतन टाटांसारख्या व्यक्तीचे चरित्र, दैनंदिनी, रोजनिशी लिहिण्याचे महत्त्व अशा अनेक विषयांवर दर रविवारी चर्चा होते.

◆ **भगिनी निवेदिता शाखा** - २५ तासांचे शिबिर





रोजच्या दिनक्रमात बदल म्हणून शिबिराचे आयोजन दि. ५-६ मार्चला झाले. आपल्या मैत्रिणींसोबत आपल्याला एक दिवस मजा, मस्ती करायला मिळेल आणि खूप काही शिकायला मिळेल म्हणून मुली सहभागी झाल्या होत्या. रविवारी सकाळी ६ वाजता समृद्धी ताईने उपासना घेतली. सकाळचे प्रसन्न वातावरण, मंद संगीत, नीरव शांतता आणि या सुंदर वातावरणात 'परब्रह्म शक्ती स्फुरो...' हे शब्द उमटले. उपासना सुरू झाली. वातावरणात सकारात्मकतेच्या लहरी



पसरल्या आणि उपासना संपन्न झाली. श्री. संदीप मोरे यांनी घेतलेल्या मानसिक विकास बैठकीत स्वामी विवेकानंद यांच्यावर आधारित गोष्टींच्या पुस्तकाचे वाचन झाले. लेखन कौशल्य या विषयावर सौ. अद्वैता उमराणीकर यांनी, खेळातून मूल्यवर्धन यावर श्री. सुरेश पवार यांनी, अभिनय कौशल्य यावर दिग्गज अभिनेते श्री. श्रीकांत यादव यांनी आणि कृतीसत्रात सौ. प्रतिभा भडसावळे यांनी वर्धिकांना मार्गदर्शन केले. अभ्यासक्रमातील संकल्पना स्पष्ट व्हाव्यात म्हणून झालेल्या विज्ञान सत्रात मुलींनी सादर केलेल्या प्रयोगांचे, प्रतिकृतींचे परीक्षण सौ. कोमल धायरकर यांनी केले. दोन वर्षांनंतर झालेल्या या निवासी एकत्रीकरणामुळे अनेक आठवणींची भर पडली.

◆ **नरवीर तानाजी मालुसरे शाखा** पुन्हा नव्या जोमाने फुलू लागली आहे. मैदानावरील व्यायाम, योगासनांचा सराव,



दणकून खेळ, नियमित तासिकांसाठी प्रयत्न, नियमित संपर्क, संख्या वाढीचे प्रयत्न, दैनंदिन परिपाठ, मानसिक विकास बैठक अशा अनेक उपक्रमांची रेलचेल शाखेत आहे. शैक्षणिक मकर संक्रमण, शिवजयंती, वाईट गोष्टींचा त्याग करण्याचा संकल्प असलेली होळी असे अनेक कार्यक्रम शाखेत साजरे झाले.



## अभिनंदनीय वार्ता



पालघर जिल्यातील भालिवली गावात 'सेवा विवेकचे' बांबू केंद्र आहे. तेथे तयार होणाऱ्या वस्तूंची **स्वप्न उद्योग** मार्फत विक्री केली जाते. तसेच लवकरच या वस्तूंची देशाबाहेर निर्यातही सुरू होणार आहे. या कार्यासाठी आज सेवा विवेक या संस्थेतर्फे 'स्व'-रूपवर्धिनीचे लहानपणापासूनचे कार्यकर्ते व सध्या सहकोषाध्यक्ष ही जबाबदारी निभावणारे, स्वप्न उद्योगचे संचालक **श्री. सुमीत श्रीकांत डोळे** यांचा महाराष्ट्राचे राज्यपाल मा. भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. 'विकसित व्हावे अर्पित होऊन जावे' ही उक्ती आपण खरोखरच सार्थ करता आहात. **सरांचे मन:पूर्वक अभिनंदन !**

## उत्थान विभाग



◆ **पुरंदर सहल** – कोरेगाव पार्क भागाची सहल पुरंदर येथे नेण्यात आली. विभागाची ही पहिलीच सहल. एकूण २८ जण सहभागी होते. सहलीला अभय पोते दादा उपस्थित होता. मुलांना पुरंदर किल्ला, मुरारबाजी यांचा पुतळा, समाधी व मंदिर दाखविण्यात आले. 'अफजलखानाचा वध' यावर रचलेला पोवाडा मुलांनी किल्ल्यावर सादर केला. गडावर आलेल्या पर्यटकांनाही तो खूप आवडला. सादरीकरणातून मुलांना गडावर प्रत्यक्ष अनुभव कसा आला असेल, कशा पायऱ्या असतील, महाराज कसे आले असतील अशा अनेक गोष्टी अनुभवता आल्या. सहलीतून कितीही अडचणी आल्या तरी सामोरे कसे जावे याचा अनुभव मिळाला.



◆ **महिला दिन** – सर्वच अभ्यासिकांवर महिला दिनानिमित्त विविध उपक्रम साजरे झाले. ज्ञानज्योती अभ्यासिकेवर मंजुषाताई यांच्या सोबत गप्पा झाल्या. त्याचसोबत गौरी ताई सुद्धा आल्या होत्या. म. फुले भागाने सावित्रीबाई फुले स्मारकात संगीत खुर्ची, लिंबू चमचा इ. खेळ घेण्यात आले. कोरेगाव पार्क भागात वस्तीतील महिलांचा सत्कार करण्यात आला. त्यात अनुजा ताई उपस्थित होत्या.



◆ **शिक्षण उत्सव** – मकर संक्रमण उत्सव हा शिक्षण उत्सव म्हणून साजरा करण्याचे ठरविले. यामध्ये भाषा, गणित, परिसर अभ्यास, प्रश्नापेढी, शैक्षणिक साहित्य निर्मिती हे विषय ठरवून १४ जानेवारी नंतर महिनाभर मुलांनी ५ विषयांवर विविध उपक्रम, खेळ, प्रतिकृती, तक्ते तयार केले व ह्या विषयानुसार सर्व अभ्यासिकांमध्ये काम सुरू झाले. १२ मार्चला याचे सादरीकरण झाले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे श्री. विनायक शुक्ल सर होते, योगेश तांबट सर उपस्थित होते. त्यानंतर कोरेगाव पार्क भागातील मुलांनी अफझलखानाचा वध पोवाड्यातून सादर केला व पुढे उपक्रमांची पाहणी सुरु झाली. सर्वांचेच खूप कौतुक झाले. यातून मुलांची एकाग्रता, ओढ, जिज्ञासु वृत्ती, कल्पकता व आत्मविश्वास दिसून आला. नवीन गोष्टी करायला व पाहायला मिळाल्या. त्यांचा उत्साह वाढला.



## समुपदेशन विभाग

दि. २ मार्चला सौ. मेघाताई नगरे यांनी रुग्ण सहाय्यक माले वर्गाला भेट देऊन विद्यार्थिनींशी 'पंचकोश' या विषयावर संवाद साधला. या महिन्यात शाखांमध्ये बुद्धिमापन चाचणी, कल चाचणी घेण्यात आली.





